imma™

# Punyanagari

## Vandrevala Foundation

**Date: 07-03-2011 | Edition: Mumbai | Page: 1 | Source: Bureau | Clip size (cm): W: 19 H: 9**

Clip: 1 of 1

# ठाणे मेंटल हॉस्पिटलचे नामकरण होणार

## आरोग्यमंत्री सुरेश शेट्टी यांचे सूतोवाच

**मुंबई/प्रतिनिधी**

ठाणे मेंटल हॉस्पिटल अर्थात वेड्यांचे रुग्णालय अशी ओळख असणाऱ्या या इस्पितळाचे नाव बदलणार असल्याचे संकेत आरोग्यमंत्री सुरेश शेट्टी यांनी दिले आहेत. मानसिक स्वास्थ्यासाठी २४ बाय ७ उपलब्ध २५७०६०००० या हेल्पलाइन चालवणाऱ्या 'वांद्रेवाला फाउंडेशनतर्फे मेण्टल वेलबिंग फॉर द नॉलेज इकोनॉमी' या विषयावर एका चर्चासत्रात ते बोलत होते.

विद्यार्थ्यांवरील ताण तसेच आय. टी., बी. पी. ओ., संशोधन, सामाजिक क्षेत्रासह अन्य विभागांत कार्यरत असताना कामाचा अतिरिक्त ताण येऊन मानसिक आरोग्य बिघडल्याचे चित्र निर्माण होते. तसेच आपापसांतील हेवेदावे, कौटुंबिक वाद यामुळे प्रचंड तणावाखाली जाऊन थेट आत्महत्येचा मार्ग स्वीकारणारे तरुण यांच्यासाठी समुपदेशनाची गरज असते; पण योग्य वेळी योग्य मार्गदर्शनाचा अभाव असतो.

ठाणे मेंटल हॉस्पिटल आहे आणि मी काही वेडा आहे का, असा दुराग्रह करून बरेच लोक मानसिक उपचारासाठी येथे जात नाहीत. त्यामुळे या इस्पितळाचे नामकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून मानसिक स्वास्थ्य बिघडल्याच्या प्राथमिक अवस्थेमध्ये योग्य समुपदेशन मिळून तणावातून मुक्ती मिळेल, असे स्पष्ट मत सुरेश शेट्टी यांनी व्यक्त केले. शिवाय, सरकारी रुग्णालयांमधील रुग्णांना दिल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वागणुकीमध्ये खुप प्रगती करून अत्युच्च दर्जाची सेवा प्रदान करण्याचा शासनाचा मानस असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मानसिक तणाव हा लपवून न ठेवता मनमोकळेपणे बोलताना मांडता यावा, यासाठी जनजागृतीची गरज आहे, असे फिरदोस वांद्रेवाला म्हणाले. पालक विद्यार्थ्यांवर अपेक्षांचा डोंगर उभा करतात, केंव्हा केंव्हा विद्यार्थीच अतिताणाला बळी पडतात. कधी कधी व्यक्तिगत अडचणींचा ताण येणारे व्यक्ती दूरध्वनीहून केल्या जाणाऱ्या समुपदेशनाला मान्यता देतात, असे मत क्लिनिकल सायकॉलॉजीमधून उच्च विद्याभूषित श्रुती दंडवते या समुपदेशिकेने व्यक्त केले. मानसिक उपचारांत तीन पायऱ्या असतात. त्यामध्ये मनोरुग्णाचे पुनर्वसन करण्याच्या बऱ्याच सुस्था आहेत. पण मानसिक स्वास्थ्य माहिती, गैरसमज आणि उपचार करणाऱ्या खूप कमी संस्था असून विना मानधन समुपदेशन करण्याचा आमचा मानस आहे,असे अनिरुद्ध जोशी यांनी सांगितले. चर्चासत्राप्रसंगी डॉ. अरुण जॉन, ह्याकनीय परेरा, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी, डॉ. हेनल शहा, डॉ. संतोष थॉमस आदी मान्यवर उपस्थित होते.